# जिल्हा समादेशक होमगार्ड ठाणे

**दुरध्वी क्रमांक:- 0251-2682085 Email Id - dchgthane@yahoo.com**

जावक क्र.जिहोगा/प्रशा/2024/ १०५८
जिल्हा समादेशक होमगार्ड ठाणे यांचे कार्यालय,
नागरी संरक्षण दल, सिध्दार्थनगर, अंबरनाथ,
(पश्चिम) - जिल्हा ठाणे.
दिनांक - २०।९।२०२४

प्रति,
जिल्हा माहिती अधिकारी,
ठाणे.

विषय :- होमगार्ड सदस्य नोंदणी कार्यक्रम वेळापत्रक बाबतची प्रेस नोट प्रसिध्दीस देणेबाबत.
संदर्भ :- या कार्यालयाचे पत्र क्र.१७३२, दि.२१/९/२०२४.

उपरोक्त संदर्भाकित विषयान्वये सविनय सादर की, होमगार्ड सदस्य नोंदणी कार्यक्रम पुढे घेण्याबाबत नमुद संदर्भानुसार कळविण्यात आले होते.

सदरचा होमगार्ड सदस्य नोंदणी कार्यक्रम हा दि.३०/९/२०२४ ते दि.३/१०/२०२४ या कालावधीत भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद , कौसा मुंब्रा येथील क्रिडा संकुल येथे आयोजित करण्यात येत आहे. सदर बाबतची प्रेस नोट आपलेमार्फत ठाणे जिल्हयातील स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द होणेस विनंती.

ऑनलाईन अर्ज केलेल्या उमेदवारांना कागदपत्र पडताळणी व शारिरीक क्षमता चाचणी करीता सकाळी ०६.०० वाजता खालीलप्रमाणे नमुद केलेल्या दिनांकास भारतरत्न मौलाना अबुल कलाम आझाद , कौसा मुंब्रा येथील क्रिडा संकुल येथे बोलाविण्यात येत आहे. उमेदवारांनी सकाळी ०६.०० वाजता उपस्थित रहावे, उशिरा येणाऱ्या उमेदवारांना मैदानात प्रवेश दिला जाणार नाही.

| अ.क्र. | दिनांक | बोलाविण्यात आलेले अर्ज नोंदणी क्रमांक | उमेदवार संख्या |
|---|---|---|---|
| 1 | दि.30/9/2024 | ठाणे विभाग पुरुष उमेदवार (महिला वगळुन) अर्ज क्र.1 ते अर्ज क्र.2724 | 2000 |
| 2 | दि.01/10/2024 | ठाणे विभाग पुरुष उमेदवार (महिला वगळुन) अर्ज क्र.2725 ते 5980 | 2583 |
| | | पालघर विभाग पुरुष उमेदवार (महिला वगळुन) अर्ज क्र.1 ते 1367 | 1000 |
| 3 | दि.02/10/2024 | पालघर विभाग पुरुष उमेदवार (महिला वगळुन) अर्ज क्र.1368 ते 5834 | 3608 |
| 4 | दि.03/10/2024 | ठाणे जिल्हा सर्व महिला उमेदवार | 1427 |
| | | पालघर जिल्हा सर्व महिला उमेदवार | 1226 |

सदर नोंदणी ही फक्त ठाणे जिल्हयातील ठाणे विभाग व पालघर विभागातील वसई पथकाकरीता संबंधित पोलीस स्टेशनच्या हददीतील रहिवाशी उमेदवारांकरीता आहे. इतर ठाणे व पालघर जिल्हा व्यतिरिक्त इतर जिल्हयातील उमेदवारांनी नोंदणी कार्यक्रमाकरीता उपस्थित राहू नये, त्यांना प्रवेश दिला जाणार नाही.

सदर बाबतची सुचना https://maharashtracdhg.gov.in/mahahg/login1.php या संकेत स्थळावर वेळोवेळी देण्यात येईल, त्यामुळे उमेदवारांनी सदर संकेत स्थळावरील सुचना करीता अद्यावत रहावे.

**(राहुल झालटे )**
जिल्हा समादेशक, होमगार्ड, ठाणे तथा
अपर पोलिस अधिक्षक, ठाणे ग्रामीण करिता

प्रत :- मा.महासमादेशक, होमगार्ड, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहितीकरीता सविनय सादर.